NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY
NASHIKMETROPOLIS

# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,नाशिक

NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१

## भोगवटा प्रमाणपत्र
## OCCUPANCY CERTIFICATE

जा.क्र.नामप्रविप्रा/भोगवटा/मौ.पळसे,ता.नाशिक/ग.नं.१४१९/१/२अ+१४१९/२/२अ,भु.क्र.१ / १२८७
दि. ७ / ८ /२०२१

प्रति,
श्री. महेश खंडु गायधनी व इतर
तर्फे जीपीए होल्डर- श्री. सद्गुरु शिवराम कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि.
डायरेक्टर श्री. प्रमोद मुर्केवार
मौजे पळसे, ता. जि.नाशिक
व्दारा - आर्कि. मुकुल पाटील

मौजे पळसे, ता.जि.नाशिक येथील ग.नं.१४१९/१/२अ+१४१९/२/२अ, भु.क्र.१, क्षेत्र २८६२.६८ चौ.मी. क्षेत्रावरील **रहिवास** प्रयोजनार्थ इमारतीचे बांधकाम करण्यासाठी या प्राधिकरणाचे पत्र क्र. नामप्रविप्रा /सु.बां.प./मौ.पळसे,ता.नाशिक/ग.नं.१४१९/१/२अ+१४१९/२/२अ/भु.क्र.१/१५२७, दि.३१.०१.२०१९ अन्वये आपणास बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. यावेळी आपण खालील प्रमाणे रक्कमा जमा केलेल्या आहेत.

| अ.क्र. | चलनाचा प्रकार | चलन क्र. व दि. | रक्कम | भरल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | छाननी शुल्क | ३११७/०६.१२.२०१८<br>२७९०/१९.१०.२०१८ | ८०/-<br>१५८१०/- | ०६.१२.२०१८<br>२८.१०.२०१८ |
| २ | प्रिमिअम आकारणी | ३११७/०६.१२.२०१८ | ३,०५,२६०/- | ११.१२.२०१८ |
| ३ | विकास शुल्क | ३१३८/०६.१२.२०१८ | ६३,३२०/- | ११.१२.२०१८ |
| ४ | सुरेक्षा ठेव रक्कम | ५५२/०६.१२.२०१८ | ६३,५३०/- | ११.१२.२०१८ |
| ५ | कामगार कल्याण उपकर | ६६१/०६.१२.२०१८ | २,६०,४८०/- | ०९.०१.२०१९ |

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. मुकुल एस.पाटील परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता / सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत या प्राधिकरणास दि. ३१.०५.२०२१ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना खाली नमूद केलेल्या तपशिल व अटींस अधीन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे.

भोगवटा प्राप्त इमारतीचा तपशिल :- इमारत क्र 2

| तळमजला | पहिला मजला | दुसरा + तीसरा |
|---|---|---|
| पार्किंग | २९५.७२४ चौ. मी. | २५४.५५+२५४.५५ |



C:\Users\hp\Desktop\nmrda latter\Plinth1.docx

**अटी व शर्ती:-**

१) अर्जदार यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस, सामासिक अंतरे इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार यांना नकाशात दर्शविलेली लगतचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) बांधकाम मंजुरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटी व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

५) प्रस्तुत प्रकल्पाकरिता सक्षम प्राधिकरणाने / ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पूर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

६) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, प्रिमियम शुल्क, विकास शूल्क इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उदभवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

७) भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या बांधकामामध्ये प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय काही बदल केल्यास व यामुळे काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार / जागा मालक जबाबदार राहतील.

**८) सदयस्थितीत कोव्हिड-१९ या साथीच्या रोगामुळे स्थळ निरीक्षण केलेले नसल्याने सदरील प्रमाणपत्र हे आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्रमाणत्र व सादर केलेले छायाचित्र आधारे देण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर बांधकामामध्ये मंजूर नकाशापेक्षा बदल आढळुन आल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार व संबंधित आर्किटेक्ट / लायसन्स इंजिनीअर जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी. तसेच भविष्यात केलेल्या बांधकामात व मंजुर नकाशात तफावत असल्याचे आढळुन आल्यास प्राधिकरण सदरचे भोगावटा प्रमाणपत्रासाठीची परवानगी रद्द करु शकते.**

(Stamp: नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण — NMRDA)

(संग्राम कानडे)
उपमहानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**
तलाठी, ग्रामसेवक, पळसे ग्रामपंचायत, ता.जि. नाशिक यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.